## प्रकरण तिसरे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सांस्कृतिकता

# प्रकरण तिसरे

# ‘जिणं आमुचं’ व ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांतील सांस्कृतिकता

३.१ प्रास्ताविक

३.२ साहित्यातील सांस्कृतिकता

३.३ दलित आत्मकथनांतील सांस्कृतिकता

३.४ ‘जिणं आमुचं’ व ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ यामधील सांस्कृतिक स्वरूप

३.५ ‘जिणं आमुचं’ व ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ यामधील सांस्कृतिकतेचे विशेष

३.६ सारांश

-----

# प्रकरण तिसरे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सांस्कृतिकता

**प्रस्तावना :**

या अगोदरच्या प्रकरणात आपण 'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील सामाजिकतेचा विचार केला. त्यामध्ये प्रारंभी या दोन्ही आत्मकथनाचा आशय साहित्यातील सामाजिकता, दलित आत्मकथनांतील सामाजिकता पाहून अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्ही आत्मकथनांतील सामाजिकतेचे विशेष पाहिले.

आता या प्रकरणात 'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील सांस्कृतिकतेचा विचार करावयाचा आहे. त्यासाठी प्रथमत: साहित्यातील सांस्कृतिकतेचा विचार करू.

## ३.१ साहित्यातील सांस्कृतिकता : व्याख्या आणि वैशिष्ट्ये

मानवी समाजाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्कृती होय. मनुष्य ज्या समाजात जन्माला येतो, मोठा होतो त्या समाजाच्या संस्कृतीपासून तो अलिप्त राहू शकत नाही. म्हणून साहित्याचा अभ्यास करतान तत्कालीन संस्कृतीचा विचार आवश्यक ठरतो. काही गोष्टी निसर्गनिर्मित असतात. तर काही गाष्टी मानवनिर्मित असतात. या दोन्ही गोष्टींचा समावेश व्यक्तीच्या सभोवती असणाऱ्या वातावरणामध्ये होतो. या वातावरणाला अनुसरून माणसाची जी जीवन जगण्याची पद्धती असते तिला संस्कृती म्हणतात. डॉ. इरावती कर्वे यांनी संस्कृतीची व्याख्या

केली ती पुढीलप्रमाणे – ''मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय.''[१] तर 'टेलर' यांनी ''समाजाचा एक घटक म्हणून व्यक्ती ज्या गोष्टी आत्मसात करते ती संस्कृती.''[२] असे म्हटले आहे. संस्कृती म्हणजे व्यक्तिनिरपेक्ष, भाषा व्यवहाराचे व आत्मप्रगटीकरणाचे साधन आहे. संस्कृतीची व्याख्या व स्वरूप थोडक्यात पाहिल्यावर संस्कृतीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करू.

**संस्कृतीची वैशिष्टये :**

- संस्कृती ही मानवनिर्मित असते.
- समाजातील सर्व व्यक्तींची व पिढ्यांची संस्कृतीवर सामूहिक मालकी असते.
- संस्कृती ही परिश्रमाने संपादन करावी लागते.
- संस्कृतीचे सातत्य टिकण्यास तिची हस्तांतरणक्षमता व संचयशीलता उपयोगी पडते.
- संस्कृतीला स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व असते.
- संस्कृतीचे एका समाजाकडून दुसऱ्या समाजात प्रसरण होते. पण त्यासाठी दोन समाजात आंतरक्रिया होणे महत्त्वाचे आहे.
- ज्या सांस्कृतिक गोष्टी व तत्त्वे काळानुसार विसंगत ठरतात ती हळूहळू नष्ट होत जातात. एका समाजाकडून दुसऱ्या समाजात प्रसरण होते व प्रत्येक नवीन पिढी संस्कृतीमध्ये भर टाकत असते. त्यामुळे संस्कृतीच्या स्वरूपात परिवर्तन होते.

* प्रत्येक समाजाला सांस्कृतिक वारसा प्राप्त होतो. बहुसंख्य लोकांची संस्कृती समान असल्यामुळे त्यांच्यात परस्पर जिव्हाळा असतो.

समाजातील व्यक्तीच्या परस्पर संबंधावरही सांस्कृतिक घटकांचा दाट प्रभाव पडलेला असतो. म्हणून संस्कृतीची ओळख करून घेणे महत्त्वाचे ठरते. त्याशिवाय समाजाचा अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही. म्हणूनच समाज व संस्कृती यांचा घनिष्ट संबंध आहे असे म्हटले जाते. साहित्याचे मूल्य दुहेरी असते. समाजातील एक सर्जनशील कृती म्हणजेच एक स्वतंत्र कलानिर्मिती म्हणून व सांस्कृतिकदृष्ट्या काव्य निर्मिती म्हणून. साहित्यनिर्मिती म्हणजे जणू कांही संस्कृतीच्या वेलीवर येणारे फुले असे म्हणूनच म्हणत असावेत. तत्कालीन जीवनाचे आदर्श, सामाजिक मूल्ये, जीवन जगण्याची पद्धती, माणसांच्या आशाआकांक्षा, सुखदुःख, या साऱ्यातून माणसाच्या संस्कृतीचे दर्शन घडते. संस्कृती ही साहत्याची केवळ पार्श्वभूमी नसते तर ती साहित्याचा आशय असते. साहित्य-कला यामधूनच प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे संस्कृतीचे दर्शन घडत असते आणि त्यातूनच मानवी जीवनाच्या, समाजजीवनाच्या, प्रगतीचा, अधोगतीचा आणि तत्सम चढउताराचा आलेख समजून घेणे शक्य होते म्हणूनच साहित्याच्या अभ्यासात साहित्याच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यासही अन्वर्थक असतो.

साहित्यात मनातील मूलभूत भावनांचा आविष्कार असतो पण भावनांना विचाराची जोड मिळाली की मनुष्य, समाज कृतिप्रवण बनने शक्य असते. समाजाला धर्मप्रवण किंवा भक्तिप्रवण करणे ही जशी प्राचीन काळाची गरज होती तशीच समाजाला कालमानानुसार परिवर्तनाच्या, क्रांतीच्या दिशेने कृतिप्रवण करणे ही सुद्धा काळाची गरज आहे. समाज कृतिप्रवण व्हायचा असेल तर सातत्याने प्रबोधनाची

प्रक्रिया सुरू असावी लागते. या प्रबोधन प्रक्रियेत साहित्याचा फार मोठा सहभाग असतो. म्हणून संस्कृतीच्या जडणघडणीत साहित्याचे मूल्य फार मोठे आहे. संस्कृतीमध्ये बाह्यसृष्टी व अंत:सृष्टी याचा अंतर्भाव असतो आणि साहित्यामध्येही बाह्यसृष्टी व अंत:सृष्टी याचे दर्शन घडते. या अर्थाने दोन्ही सृष्टीतील विषय साहित्याचे अनुभवविषय बनतात. साहित्य हे संस्कृतीचे संरक्षण करते त्याचप्रमाणे संस्कृतीच्या संवर्धनातही साहित्याचा फार मोठा भाग असतो.

## ३.२ दलित आत्मकथनांतील सांस्कृतिकता :

दलित आत्मकथने ही इथल्या संस्कृतीची चिकित्सा करणारी संस्कृतीचा आलेख काढणारी, सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास सांगणारी आहेत. प्रत्येक जातीजमातीतील सांस्कृतिक रचना वेगळी आहे. कोल्हाटी समाज, बेरड समाज, गोपाळ समाज कुडमुडे जोशी, मांग-महार या प्रत्येक समाजाची रूढी, संस्कृती वेगळी आहे. वर्षानुवर्षे मराठी साहत्य या विश्वापासून अनोखे राहिले होते. त्या समाजाचे समज गैरसमज, रूढी परंपरा, श्रद्धा, ह्या सर्वातून या समाजाच्या संस्कृतीचा जीवनपट आपल्यासमोर उभा रहातो. ज्या समाजाला वर्षानुवर्षे गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागले. त्यांच्या समाजातील विवाह, सण, समारंभ, रीतीरिवाज अगदी मृत्युपर्यंतचे चित्रण या सर्वांपासून मराठी समाजाला नवी ओळख झाली. नव्या संस्कृतीचे भान आले. प्रत्येक प्रदेश आणि प्रदेशातील लोकजीवनाचे निराळेपण या आत्मकथनांतून येते. 'बलुतं' मधून येणारा संगमनेर-धामणगाव परिसर, 'माज्या जल्माची चित्तरकथा' मधील माणदेशचा परिसर, 'मरणकळा' मधील पाथर्डीचा परिसर, 'उपरा' मधील खंडोबाचा जत्रेचा परिसर, 'जिणं आमुचं' मधील वीर ते फलटण परिसर हे सारे परिसर त्या-त्या परिसरातील लोकजीवनासह

चित्रित होतात. त्यामुळे त्या-त्या समाजाची भिन्न संस्कृती आपल्यासमोर उभी रहाते.

सांस्कृतिक पातळीवर विचार करताना 'भाषा' हा महत्त्वाचा घटक लक्षात येतो. प्रत्येक आत्मकथनकार आपण ज्या परिसरात राहिलो त्या परिसरातील वेगळ्या बोलीसह आत्मकथन करत असतो. तेलगु, मराठी, कानडी या तीन भाषेच्या संगमावरील 'देगलूरला' वाढलेल्या 'वैजनाथ कळसे' यांची भाषा, 'आठवणीचे पक्षी' मधील सोनकांबळे यांची सरस भाषा, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने यांची त्यांच्या जमातीच्या विशेषांसह येणारी भाषा, 'जनाबाई गिऱ्हे' यांची 'मरणकळा'मधली गोपाळ समाजाची भाषा, 'बेबी कांबळे' व 'शांताबाई कांबळे' यांची स्त्रीसुलभ भाषा, कोल्हाट्याच पोरं, मधील कोल्हाटी भाषा ह्या दृष्टीने अभ्यासाचे नवे क्षेत्र देणाऱ्या आहेत. बहुतांश आत्मकथने नागरी आणि ग्रामीण दोन्ही संस्कृतीचे दर्शन घडवतात. त्याचे कारणही स्वाभाविक आहे. या आत्मकथनांने लेखक ग्रामीण भागातून आलेले आणि नंतर नागरी जीवनाचा संपर्क झालेले आहेत. त्यामुळे या दोन्ही संस्कृतीचा भाग यात चित्रित होतो. दलित आत्मकथनांनी 'स्व'ला केंद्रित करून आत्मलेखन केले नाही. समाज, समूह, संस्कृती या तीनही गोष्टींना प्राधान्य देऊन लेखन झाल्यामुळे दलित आत्मकथनांत सामाजिकता व सांस्कृतिकतेचा मिलाफ आढळतो.

## ३.३ 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सांस्कृतिकता स्वरूप :

प्रल्हाद लुलेकर दलित, आत्मकथनांतील सामाजिकता व सांस्कृतिकता स्पष्ट करताना म्हणतात, ''दलित साहित्यातील आत्मकथा म्हणजे दलितांच्या सांस्कृतिक

क्रांतीचा इतिहास आहेत. दलित आत्मकथने ही इथल्या संस्कृतीची चिकित्सा करणारी, सांस्कृतिक क्रांतीचा इतिहास सांगणारी आहेत''[२] असे म्हटले जाते. संस्कृती म्हणजे एका अर्थी समग्र वर्तनवादच म्हणता येईल. कारण साहित्यात मानवी मनातील मुलभूत भावनांचा अविष्कार होतो. तेव्हा अशा व्यक्तिजीवनाचे व व्यक्तीच्या भावजीवनाचे दर्शन साहित्यातून घडते व हे आचारविचार, रूढीपरंपरा, भाषा, व्यवसाय इ. घटक संस्कृतीचे निर्देशक असतात. म्हणून साहित्यातून लाक्षणिक अर्थाने संस्कृतीचे दर्शन घडते.

एकोणिसाव्या शतकातील सांस्कृतिक परिवर्तनामुळे शिक्षण, पाश्चात्य विद्याभ्यास, भौतिक शास्त्रांचा परिचय याद्वारे मध्यमवर्गाचे जसे उद्‌बोधन होऊ लागले तसे क्षुद्रातिक्षुद्रांचेही होऊ लागले. दलितांना अभिव्यक्तीचे साधन मिळू लागले. लेखणीचे व वाणीचे सामर्थ्य गवसू लागले. त्यामुळे त्यांचा भाषिक व्यवहार सुरू झाला. त्यातूनच वेगवेगळ्या संस्कृतीचे जग साहित्यातून येऊ लागले. वर्षानुवर्षे गावकुसाबाहेर राहिलेली ही संस्कृती अभिजनांना हादरा देणारी ठरली. बौद्धेतर आत्मकथनांमध्ये संस्कृतीचे चित्रण अधिक्याने येते. तसेच बहुतांश दलित आत्मकथनांमधून ग्रामीण व नागरी दोन्ही संस्कृतीचे दर्शन घडते. कारण समाज व संस्कृती काळानुरूप बदलते हा अलिखित नियम आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे. शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अशा वेगवेगळ्या भिन्न स्तरावर येथील स्त्री विपत्ती गेली आहे. उच्चवर्णियांनी जातिव्यवस्थेला प्रमाण मानून व विटाळ, अस्पृश्यता या भ्रामक कल्पनांची एका मानवी समूहाला वर्षानुवर्षे वाईट अवस्थेतील जिणं जगाव लागलं. ज्ञानार्जनावर एका विशिष्ट वर्गाने अधिकार सांगितल्यामुळे अक्षर ओळख झाली नाही. त्यामुळे

सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक या तीनही संदर्भावर व्यक्तिविकास खुंटला गेला. त्यामुळे दलित स्वकथनात विद्रोही सूर आळवून सर्वच दलित लेखकांनी या संदर्भाचा उल्लेख केला. 'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' यात स्त्री लेखिकांनी त्यांच्या वेळच्या विवाहप्रसंग, रूढीपरंपरा, सणवार, बाळंतपण, नातीगोती, शिक्षण, शिक्षणामुळे आलेले परिवर्तन, कौटुंबिक पातळीवरील सासूसून, नवरा-बायको संबंध इ. तपशिलवार बारकावे लिहिले. त्यामुळे या काळातील सामाजिक परिस्थिती बरोबरच तत्कालीन संस्कृतीचेही दर्शन आपल्याला झाले. त्यातील एकेक घटकाचा उदाहरणासहीत परामर्श घेणे उचित ठरेल.

## 'जिणं आमुचं' यातील सांस्कृतिकता स्वरूप :

### विवाह प्रसंग :

दलित समाजाला वर्षानुवर्षे शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे सर्वच दलित समाज अज्ञानाच्या खाईत गटांगळ्या खात होता. बेबीताईंनी आपल्या आत्मकथनामध्ये वैयक्तिक आठवणींपेक्षा समाजचित्रणावर जास्त भर दिला आहे. त्यामुळे त्यांचया मार्मिक निरिक्षणशक्तीचा अनुभव अनेक प्रसंगातून येतो. विवाहाचे वर्णन बेबीताईनी बारीकसारीक तपशीलासह केले आहे. बेबीताई म्हणतात, ''गुलामगिरीच्या शृंखला जगाने आमच्या हातात अडकवल्या पण आम्हीही माणसंच होतो ना. आम्हालाही कुणावर वर्चस्व गाजवायची वेळ येत असेल. पण आमचं ह्या जगात कोण वर्चस्व गाजवून घेणार ? मग आम्हीही आमच्या माणसांवरच वर्चस्व गाजविण्याची सोय केली. आमच्या सुनांच्याच गळ्यात गुलामगिरीची जोखड बांधली.'' (पृष्ठ क्र.८८) अगदी आठ नऊ वर्षाच्या मुलींना तर 'लग्न' म्हणजे काय माहितही नसेल व आठवतही नसेल. या कथा व मुलींची लग्ने

त्यावेळी केली जात. बेबीताई त्याला 'आठ दिवसाचा गोंधळ' असे नाव देतात. त्याचे वर्णन लग्नाचा मांडव घातल्यापासून ते मुलीला घरी नेईपर्यंत बेबीताईने बारकाईने करतात. विवाहावेळची आंघोळ, मेजवानी, करवल्यांचा घोळका, करवल्यांची पान खायची पद्धत, दुसऱ्या दिवशी हळद लावणी, त्यांनतर पाच दिवस नवरा-नवरी जमिनीला पाय लावत नसत. ब्राह्मण शिवाशिवीच्या भितीने लांबूनच लग्न लावत असे. ब्राह्मणाला दक्षिणा व कोरडा शिधा द्यावा लागे. पोळ्यांचे जेवण, नवरी लपवण्याची पद्धत, सुपारी लपवण्याचा कार्यक्रम, रूकवत फिरवणे, त्या रूकवतात गाणी रचून एकमेकांवर कुरघोडी करणे, त्यानंतरची भांडणे, मारामाऱ्या ह्या सगळ्यात चार दिवस संपत. चवथ्या दिवशी बाशिंग सोडवण्याचा कार्यक्रम असे. रडून रडून स्त्री पुरूष ते बाशिंग सोडवत त्यावेळच्या गाण्याना 'झालू' म्हणत.

> ''झालूबाई झालू दारात
> व्हती बोर-बोराई
> त्याच्यावर बसला चोर जावई
> ज्याची व्हती त्यानं नेली,
> येडी माया वाया गेली....''[३] (पृष्ठ क्र.८३)

या गाण्यावर सगळ्यांना रडायला येई. यानंतर बाशिंग बांधण्याचा कार्यक्रम झाला की खऱ्या अर्थाने नवरा-नवरी ह्या ओझ्यातून मुक्त होत. पण बेबीताई म्हणतात ही लग्न म्हणजे मुलींवर आलेली जिन्न होत. कारण ह्या आठ दिवसानंतर त्या एवढ्याशा लेकराचा वनवास सुरू होई. सासुरवाडीची सर्वच लहानथोर मंडळी त्या मुलीचा अनन्वित छळ करत. त्या छळाची वर्णन वाचूनही अंगावर काटा उभा रहातो. सकाळी लवकर उठून दिवसभर राबून मारझोड शिव्याशाप यातून ती छोटीशी मुलगी वाचली तर बाळातपण हा नैसर्गिक शाप ती स्त्री म्हणून सोसत असे.

स्त्रियाच स्त्रियांच्या छळाला कारणीभूत झालेल्या दिसतात. त्यांनाही ह्याच छळाला सामोरे जावे लागल्यामुळे त्या सुनांना हरतऱ्हेने त्रास देऊन आपल्यावरील त्रासाचे जणू काही 'उट्टे' काढत. म्हणजेच विचार हा आनंदाचा विषय माणसांच्या आयुष्यात असतो हा विचार अनेक भोगवट्यांना स्त्री सामोरी जात असे.

**बाळंतपण :**

एक स्त्री असल्यामुळे स्त्रीच्या दु:खाला पदर अधिक प्रत्ययकारकरित्या उलगडणे बेबीताईंना सोपे गेले आहे. शिवाय त्या त्याचसमाजात लहानाच्या मोठ्या झाल्यामुळे वेदनेची प्रत्येक गाथा त्यांनी अधिक बारकाईने सांगितले आहे. शिक्षण नसल्यामुळे कमालीची अज्ञान व अंधश्रद्धा असे. ह्या अज्ञानापोटी स्त्रिया, लहान मुले, म्हातारी माणसे सर्वच जग अंधश्रद्धेचे बळी जात. स्त्रियांना लहान वयात विवाह असल्यामुळे लहान वयातच बाळंतपणाला सामोरे जावे लागे. स्त्रियाचं, स्त्रियांच्यावर अज्ञानापोटी फुकटचे मिळेल ते उपचार करत. घरच्याघरी बाळंतपण असल्यामुळे, त्यावेळच्या सगळ्या बायका आपापल्या परीने त्या बाळंतिणीचे हाल करत. गरीब आईबाप भितीने, सगळे उपचार करत. गंडा-दोऱ्यापासून कोण काय म्हणेल ते उपचार करत. ह्या सगळ्या भयानक प्रकारातून ती लहान मुलगी वाचली तर पुढील भोगाला सामोरी जाई. बेबीताई म्हणतात, ''वाहणारा रक्तस्त्राव धरण्याला त्यांना साधी चिंधीही मिळू नये.''[४] त्यांनतर फुकटचे जळणव फुकटचे पाणी त्यामुळे प्रचंड कडक पाण्याने बाळाला व बाळाच्या आईला आंघोळ घातली जाई. दिवसातून दोन वेळेला आंघोळ असे. एखादी नशिबावान बाळंतीण असेल तर तिला खायला ज्वारीच्या भरडलेल्या कण्या अगदी मऊ शिजवून पोटभर खायला मिळत. ज्या बाळंतिणीकडे खायला नसे ती बाळंतिण रिकाम पोट भुकेमुळे आग

पडत असे म्हणून बांधून ठेवत असे. आंघोळी, सुईणींचा अघोरीपणा त्यांनी केलेल्या जखमा या सर्वांमुळे बाळंतिणीला धनुर्वात व्हायचा. बाळंतिणीला मदनवायू झाला असा गैरसमज करून सगळा महारवाडा उपाय करायला पुढे असे. उतारा, गंडादोरा यासारखे उपाय केले जात. या इतक्या अघोरीपणामुळे दहात एक असे बायकांचे प्रमाण असे. बायका व तान्ही मुले मरत व हे मरण सटवाईने दिले असे अंधश्रद्धेमुळे त्यांना वाटत असे. ह्यातून एखादी स्त्री जगली तर तिला पाच पालव्यांचा नैवेद्य देत. जनावर त्यावेळी मेले नसेल तर ते मारण्यात येई व त्यातील मासांचे आपले वाटे घेऊन घरी येऊन ते मांस शिजवले जाई. त्याचे वर्णन केले आहे ते त्यांच्याच शब्दात बघितले असता अधिक परिणामकारक वाटते. ''बाई लगबग घरी येऊन त्या पाच पालवी शिजाय घालत, बाळाच्या पोटात करचू नये म्हणून अगदी मऊ मऊ शिजवत. मग दिवस मावळला की बायकांची जोरात हालचाल सुरू होई, खणलेल्या त्या नाणीच्या खड्यावर सात बारके बारके दगड पाण्यात धुऊन मांडत. ओळीने दगड मांडत, त्याला हळदकुंकू लावून पाच पालवीचा निवद दगडापुढे मांडत. बाळंतिणीच्या अंगावर चौगडी करून घालायचं, बाळंतिणीला लहागरीभर पाच पालव्या खाऊ घालत.''[५] (पृष्ठ क्र.६०) अशाप्रकारे जगलेली ती बाळंतिण रात्रभर जागून सटवाई बाळाच भविष्य लिहिल व ती नशीब घडविलं म्हणून वाट बघत. अशाप्रकारे अज्ञानापोटी दलित समाज अतिशय घृणास्पद जीवन जगत होता.

**रूढीपरंपरा सणवार :**

प्रत्येक दलित आत्मकथने ही सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाची ठरतात. कारण त्यातूनत्या त्या समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आपल्याला

कळून येतात. रूढी, परंपराचे पालन हे अज्ञानापोटी वर्षानुवर्षे केले जाते. दलितांच्याबाबत तेच सत्य होते. डॉ. बाबासाहेबांनी आपले तत्त्वज्ञान दलितांना बिंबवले तोपर्यंत पशुवत जीवन संपूर्ण दलित समाज जगत होता. आषाढाचा महिना म्हणजे तत्कालीन महारजातीला देवधर्माचा महिना वाटे. वर्षातून हा एकच महिना त्यांच्या आयुष्यातील हिरवळीचा असे. आंघोळी, धुणपाणी, सारवण-सुरवण अशी स्वच्छता महारवाड्यातील घराघरातून चाले. थोडेफार गोडधोड या महिन्यात ते खात. गावातले देवऋषी यांना याच महिन्यात महत्त्व प्राप्त होई. त्यांना त्यांचे कौशल्य दाखवण्याची जणू संधीच प्राप्त होई. पडक्याझडक्या खोपटांच्या भिंती शेणाचिखलांनी लिंपल्याजात. मातीच्या पोतेऱ्याने सारवल्या जात. न्हाणीधुणी चालत. पोतराजांना तयार केले जाई. अंगात येण्याचे प्रकार चढाओढीने चालत. घरातली म्हातारी पुरूषमंडळी अंगात आलेल्याबाईच्या नाकदुऱ्या काढत. किंचितशा गोडाधोडाने वर्षभर करपलेली आतडी शांत होत. गरिबीमुळे अज्ञानामुळे भीक म्हणजे सुद्धा त्यांना भूषण वाटे. एखादी शेजारीने दुसऱ्या तरूण शेजारणीला तिच्या घराचा मोठेपणा सांगताना म्हणे, 'सरू आगं तुजा सासराच वागुलाहोता. मायंदाळी त्याला मिळकत. दोन दोन झोळ्या, खाऊन भरून ओज्यानी आम्सी करकर करमर, वाकत याचा बग.'[६] (पृष्ठ क्र.१७) भाकरी मागून खाणाऱ्या येस्कराची काठी म्हणजे त्यांना राजदंड वाटे. या समाजात किती अज्ञान होते तर. एखादा शहाणा माणूस जर दुसऱ्याला त्याची मुलं शिकवायला सांगत असेल तर त्याला ते पटायचे नाही. गावकीची कामे सोडा, येस्करकी करू नका, मेलेले जनावर खाऊ नका, तर त्याला ते पटायचे नाही. इतकी रूढींचे पालन करण्याची अज्ञानी वृत्ती दलितांची झाली होती. दारिद्रयालाही चर्चा चालत त्या अंगात येण्याच्या,

सवारी येण्याच्या, शेंदूर लावलेल्या दगड धोंड्यांच्या हे अपार दारिद्रय, अंधश्रद्धा आणि देवभोळेपणा, अज्ञान एकूण लाचार व अपमानित जिणे. बेबीताई चितारत. त्यातून पन्नास वर्षाच्या मागील महारांचे धर्म त्यांच्या रूढ कल्पना, परंपरागत आलेले आचार-विचार, देवदेवतांचे अवास्तव व विकृत स्तोम, त्यांचा वृथाभिमान याविषयी त्यांना खंत वाटते आणि चोडही येते. कारण ह्या परंपरा वर्षानुवर्षे अज्ञानापायी पाळल्या जात होत्या.

'रेडे जतरा' प्रसंगाचे त्यांनी केलेले तपशिलवार वर्णन हे दलित सांस्कृतिकतेचा नमुना आहे. रेड्याला देवीच्या पुढे पाटलाच्या हातून बळी दिले जाई व त्यांचे मांस सर्व महारांच्या घरी प्रसाद म्हणून वाटले जाई. लहान मुले वृद्ध स्त्रिया भक्तिभावाने तो प्रसाद खात. ''मोठमोठ्या दगडाच्या चुली करत. त्या ठणठणत्या जाळात एका चुलीवर रेडा शिजवत तर दुसरीवर कण्या शिजत. मांस शिजल्यावर त्यात फक्त लाल मिरचीची भुकटी टाकून तपेली तपेली पाणी वाढवत. त्यालाच वांजी म्हणत. ती फारच छान झाली तर तिला लामी म्हणत.'' असे वर्णन आढळते. यावरून लक्षात येते, अंधश्रद्धेची बुरसटलेल्या विचारांनी रूढीचें पालन केले जाई. महारांचा मेलेल्या जनावरांवर जसा हक्क असे तसाच मेलेल्या माणसावरही असे. मेलेल्या माणसाची खबर परगावी कळवणे, हे येस्कराचे काम असे. उपाशीपोटी, अनवाणी महार लांबवर जाऊन ही खबर कळवत असे. येस्करकी, पोतराज सोडण्याची पद्धत या चालीरितीचे सखोल वर्णन बेबीताई करतात. घरातील सगळ्यात मोठा मुलगा पोतराज म्हणून सोडला जाई व मोठेपणी तोच देवऋषी होई व आपल्या समाजाच्या श्रद्धा-अंधश्रद्धा पाळत आपल्याबरोबर समाजालाही अज्ञानाच्या पायी अंधश्रद्धेच्या खाईत लोटून देई.

पूर्वपरंपरेने चालत आलेल्या रूढीपरंपरा आणि संकेत पूर्वाश्रमीच्या महारसमाजात मोठ्या प्रमाणात आढळत. विशिष्ट समाजव्यवस्थेने धर्माचे व पापपुण्याचे अधिष्ठान दिल्यामुळे हा समाज कित्येक वर्षे ह्या प्रथांना चिकटून राहिला.

**नातीगोती :**

बेबीताईंच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनाचा विचार सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. कारण 'स्व'पेक्षा 'स्वसमाज चित्रण' त्यांनी अधिक केले. त्यामुळे स्वत:विषयी त्यांनी इतर आठवणींच्या ओघाने फार थोडे लिहिले आहे. त्यांचे गाव, त्यांचे आजोळ, आईवडील, आजी आजोबा, मावशी भाऊ, चुलत आजोबा यांच्याविषयी फार थोडी माहिती मिळते. त्यांच्या वडलांनी फलटण येथील कॅनॉलचे कॉंट्रॅक्ट घेतले होते. असा उल्लेख आढळतो. पण इतर समाजातील, आई-वडील, सासू-सून, आई-मुलगा ही नाती फार दैन्य व दु:खामुळे विस्कटलेल्या स्वरूपात येतात. सासू ही सुनेचा छळ करते कारण तिच्या सासुनेही तेच केलेले असते. शेजारणी, वृद्ध स्त्रिया ह्याही अशा छळाला प्रोत्साहन देत. ''ह्याच्या शिव्या खा त्याच्या शिव्या खा, शेंबड्या नणंदाच्या, मोंगळ्या दिरांच्या, असा सगळ्या घराच्या ह्या गाड्यात सासुरवाशीणीस एकदीड धुण्यास वाजत.''[१७] (पृष्ठ क्र.९६) अशा शब्दात वर्णन येते. सासुरवासाची परिसीमा म्हणजे मुलाच्या मनात बायकोबद्दल इतका द्वेष भरवला जाई ही प्रचंड मारहाण, धळ नवरा, सासू-सासरा यांच्या छळाला कंटाळत ती सासुरवाशीण माहेरी पळून जाई तर तिथेही मारझोड होई. कारण गरीबीमुळे आणखी एक जीव पोसणेही कठीण होई. या अवस्थेत ती मुलगी परत सासरी येई व यातनांचा महापूर तिच्या वाट्याला येई. पाच किलो वजनाएवढा लाकडाचा चौकोनी ठोकळा सुतारांकडे नेऊन त्याचा खोडा

बनवत. त्यात पाय अडकवलेल्याअवस्थेत ही मुलगी सर्व काम करी. त्या खोड्याचा चौकोन घमेल्याएवढा असल्यामुळे पाय रक्तबंबाळ होत. ह्या हाताला कंटाळून ती सासुरवाशीन पळून गेली तर तिला परत आणून रात्रीच्यावेळी तिच्या छातीवर बसून तिचे नाक कापत. अशा नाक कापलेल्या स्त्रीला 'मूडी' म्हणत. तिचा स्वीकार माहेर-सासर कुठेच होत नसे. 'सासू' ही स्त्रीचं स्त्रीच्या छळाला कारणीभूत ठरे. चाळीस सालापर्यंत ही स्त्रीची अवस्था होती. मुकाट्याने अन्याय-शोषण दलित स्त्री करून घेत असे. म्हणून कुटुंब व समाज ह्या दोन्ही पातळीवरील तिचे जीवन दु:खाने ओतप्रोत भरलेले असे.

**दलित स्त्रीचे जीवन व शिक्षण :**

'जिणं आमुच' हे बेबी कांबळे यांचे पुस्तक म्हणजे एका दलित स्त्रीच्या दु:खाची कहाणी आहे. पण 'स्व' पेक्षा समष्टीचे दु:ख अधिक चित्रित झाल्यामुळे हे जिणे केवळ लेखिकेचे न रहाता लेखिकेसारख्या अनेक स्त्रियांचे आहे. १९४० वर्षापूर्वी दलित स्त्रीचे जवीन एकमेकींपासून पूर्णपणे वेगळे असे नव्हतेच. महार समाजातील स्त्री, तिचा अल्पवयीन विवाह, तिच्यावर वरचष्मा ठेवण्यासाठी सतत प्रयत्नात असणारी सासू, तिने पळून जाऊ नये म्हणून तिच्या पायात खोडा टाकणारे व प्रसंगी तिचे नाक कापणारे सासू, सासरा, दीर, नवरा, शेजारी या सर्वांचे चित्रण लेखिकेने केले आहे. हालअपेष्टाग्रस्त व रूढीग्रस्त समाजाला देव-देवर्षी, अंगारे-धुपारे यांचेच महत्त्व कसे वाटत होते, देवदेवतांना तुष्टविणे यात हा समाज आपली दु:खे कशी विसरत होता याचेही चित्रण त्यांनी केलेले आहे. आपल्या सभोवतालच्या स्त्रियांच्या दु:ख दैन्याचा एक एक पदर लेखिकेने उलगडून दाखवला आहे. विवाहाचे सारे विधी कौतुकाने सांग्रसंगीत साजरे करायचे, नांदायला मुलगी

आली की मात्र तिचा सासुरवास करायचा. लेखिका म्हणते, ''ही लहानपणाची सक्तमजुरी परवडली ! पण वयात याचं म्हंजे सुळावर चढल्यासारखे सुनेला पहिला पदर आला की सासूबाईची उलाघाल व्हायची आणि त्या घरात सासूबाई सारखी बसून राह्यची. सासू डोळ्यात तेल घालून दोघांची राखण करायची. रात्री ती दोघ एकत्र येतील म्हणून सासूबाईन रात्रभर जागरण करावं कारण जावाभावानी शिकवावं ''सुनेला पोराजवळ लई येळ झोपू देऊ नगस आपला कवळा कोंबा मोडल बघ वाईच हुशारीन ऱ्हावं.''[८] (पृष्ठ क्र.९७) अशाप्रकारे मुलाच्या मनात वितुष्ट निर्माण करावसं, सून पाण्याला गेली की भाकरीच्या पिठात बांगडीच्या काचा मिसळून सून आपल्या मुलाचा घात करते आहे हे सिद्ध करावं. सून बाहेरख्याली असल्याचे सिद्ध करावं. अनान्वित छळ करून नाक कापून तिला हाकलाव व अशाच एखाद्या मुल झालेल्या परित्यक्ता स्त्रीशी म्होतूर लावण्याची सूचना मुलाला केली जायची. पुरूष माणसेही याला प्रोत्साहन घ्यायची.

असा सासुरवास वाट्याला आल्यामुळे काही स्त्रिया अंगात येण्याचे नाटक करून आपल्याकडे लक्ष वेधल्याचा केविलवाणा प्रयोग करत. दुसऱ्या बाजूला कोणा गरीबाची लहानगी सून लाकड (बिंडा) विकायला जाताना 'मारनी पाया पडन घालतात धनी' असे म्हटले नाही तर लगेच प्रतिक्रिया यायची, ''ए ! हे कुनाचं गं रगील दोडका हय ? का पाटलाची सून हय ?''[९] (पृष्ठ क्र.५१) अशा खोचक बोलण्याला सासू सासरेही सहकार्य करायचे. ''तुजं मायबाप काय कोलाटी-बिलाटी व्हौत व्हय ? त्यांच्या गावात चालबील हय का नाय ? पाया पडतं घालायची ? ........... तुजी आय गाडवीन-बिडवीन व्हती का काय ? तिला न्हाय कळालं लिकीला शिकवाया.''[१०] (पृष्ठ क्र.५२, ५३) असा माहेरच्या

लोकांचा उद्धार व्हायचा. एकंदरीत जिणं आमुचं मध्ये बेबी कांबळे यांनी आपलया समाजातील जीवनाचा विशेषत: स्त्री जीवनाचा वेध घेतला आहे. अनेक ठिकाणी जगण्यातील कारूण्याला किंचित विनोदाची झालर आढळते. उदा आषाढातील आंघोळीचा घाट किंवा अनंत ठिगळे जोडून केले महावस्त्र धुण्याचा प्रसंग, य गोष्टीची साक्ष देतात. मेलेल्या गुराचे मांस, गावातून मागून आणलेल्या शिळ्या अन्नाचे कालवण किंवा घरातील दारिद्रयाचे चित्रण हे सारे शहारे आणणारे आहे. लेखिकेने म्हणून आपल्या समाजाला बिगर शेपटीचा जनावरासारखा समाज असे म्हटले. कारण परंपरेचे संस्कार टाकून बदलणे त्याला शक्य होत नाही. त्यामुळेच लेखिकेच्या आजी आजोबांना कारभारी म्हणायचा, ''बस कर तुज पादरीग्यान''[११] (पृष्ठ क्र. ६६) शिक्षणालाही हे कारभारी विरोधच करायचे. कारण ''शिकून बामन-बिमन व्हयाच असल तर पोरांनी शाळा शिकवावी'' असे त्यांचे मत होते. म्हणून ''आसं उल्ट पानी व्हायाला लावू नका, आपुन आयपंढरीची लेकरं हाय, तिनं आपल्याला शिक्का दिलाय तो चालवलाच पाईजी.... आपल्याला देवानी पायरी दिलीया, ती बलांडायची व्हय रं !''[१२] (पृष्ठ क्र.६७, ६८)

चावडीवरील अशा वादविवादातून हळूहळू हा समाज बदलला. आंबेडकरांच्या तत्त्वविचारांचा प्रसार हळूहळू होऊ लागला. आंबेडकरांचा आत्मविश्वास होता की स्त्री बदलली तिचे कुटुंबही सुधारू शकते. त्याप्रमाणे जिथे जत्रा वगैरे सारखे प्रसंग असत जिथे माणस जमत तिथे डॉ. बाबासाहेब व त्यांचे अनुयायी दलितांत जागृती आणण्याचे प्रयत्न करत. त्यातूनच हळूहळू सुधारणा होऊ लागली. ''आताशा कुठ माणसाला शहाणपण येऊ लागलं. लंगोट्या टाकून आता मुलांना मुलाचे आईबाप पायजमा शिवू लागले. मुलांना पायजमा शर्ट अंगावर

घालण्याची सवय लागली. शेंबड्या पोरींच्या केसांची कटींग करू लागली. प्रत्येक आईबापानी आपली मुल शाळेत घातली.''[१३] (पृष्ठ क्र.६८) असे जागृती होऊ लागल्याचे वर्णन आहे. मेलेले मढं खान सोडून देण दलितांना सुरवातीला जड गेलं पण हळूहळू दलित समाजाचा आत्मोद्धार होऊ लागला. लेखिकेच्या आजीने त्याची सुरुवात केली. ''मग ढोरमांस न खाण्याच्या तिथच शपती घेतल्या आणि आपोआप त्यांच्या तोंडून पहिली घोषणा निघाली, 'भीमराव की जय !'[१४] अशी गर्जना करून त्या दिवसापासून वीरच्या महारवाड्याच मढं खानं बंद झालं. अजुनही वीरच्या माणसांची गाठ पडली तर ती जुनी आठवण काढून म्हणतात, ईरातील पहिल मढं खातं सीतावैयनीनी बंद केल. ही मठी पडी म्हणजे महाराच वैभव होत.''[१५] (पृष्ठ क्र.७०) असे वर्णन लेखिका करते. त्यानंतर लेखिका तिच्या शाळेतील सवर्ण मुलींचे व दलित मुलींचे भांडण सांगते. त्यावरून लक्षात येते की, वर्षानुवर्षे ज्या दलितांनी मुकाट्याने अन्याय सोसला त्यांनी सवर्णांना विरोध करायला सुरूवात केली व यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा होती.

म्हणूनच बेबी ताईंच्या लेखनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रती कृतज्ञता दिसते. कारण एका अन्यायग्रस्त जनतेला ताठ मानेने जगायला डॉ. बाबासाहेबांनी लावलं.

### 'माज्या जल्माची चित्तरकथा' मधील सांस्कृतिकता विशेष :

'माज्या जन्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सांस्कृतिकता अभ्यासण्यासाठी त्यातील विवाह, बाळंतपण, नातीगोती, रूढी परंपरा या घटकांचा परामर्श घेऊ.

**विवाह प्रसंग :**

शांताबाईंच्या विवाहाचा प्रसंग त्यानी लिहिला आहे. त्यावेळी मुलीच्या पसंतीचा प्रश्न नव्हता. मुलांनी मुलगी पसंत केली ही मोठी माणसे विवाह ठरवत. शांताबाईंचा विवाहही असाच ठरवला गेला. लग्नाच्या आधी कांबळे मास्तरांचे कुणा बाईशी संबंध होते व लग्न झाल्यावरही शांताबाईंच्या अवघडलेल्या अवस्थेतही त्यांनी दुसरे लग्न केले होते. या प्रसंगातून पुरूषप्रधान संस्कृती दलित समाजातही होती. नवऱ्याचे बाहेर संबंध समाज स्वीकारत होता असे दिसते. तसेच शांताबाईंनी स्वत:ही संयमीपणाने, कांबळेमास्तर परत आल्यावर त्यांना माफ करून नेकीने संसार केला. विहप्रसंगाच्या वेळीचे काही रूढींचे शांताबाईंनी वर्णन केले आहे. विशेषत: हळदीचा प्रसंग, लग्नाच्यावेळचे जेवणाचे पदार्थ, लग्नप्रसंगाची गाणी त्यांनी सांगितली आहेत.

> ''मांडवाच्या दारी तितं पेरली जाय, तितं पेरली जाय ।
> शेस भरायला आली, सक्या नवऱ्याची आय ।''[१६] (पृष्ठ क्र.७२)

असे आनंदाचे प्रसंग लग्नसमारंभाच्यावेळी महारांच्या जीवनात येते. हे वर्णन वाचले तरी काही प्रसंगी महारांच्या अज्ञानापोटी स्त्रियांवर कसा अन्याय होत असे हेही शांताबाईंनी सांगितले आहे. शांताबाईंच्या चुलत सासऱ्याने लग्नाला पोचवायला आलेला भाऊ परत निघाला तेव्हा नवरी रडली या सूचक कारणांमुळे तिला सोडून दिले होते. दुसऱ्या बायकोलाही तिचे चरित्र खराब म्हणून सोडून दिले हे वाचले असता जाणवते. ही स्त्री म्हणजे दावणीला बांधलेली गरीब गाय. मुकाट्याने अन्याय सोसणे हाच तिचा धर्म. स्वत: शांताबाईही शिकलेल्या असून त्यांना इतर दलित स्त्रियांसारखे पुरूषी वृत्तीला सामोरे जावे लागले.

**बाळातपण :**

लेखिका व लेखिकाची आई या दोघींनीही मुक्त होण्यासाठी व जगण्यासाठी ठिकठिकाणी नवस केले होते. त्यातून त्या काळातील अंधश्रद्धेचे प्रकार असले तरी त्यांचे बाळातपण हे सुखाचे नव्हते. खायला अन्न नाही म्हणून बारा दिवसांची लालू म्हारीन कणस चोरून खाते. लेखिकेची आई स्वत: बारा दिवसाने छोट्या शांताबाईला गोठ्यात ठेऊन कामाला जाते. स्वत: शांताबाईही पहिला मुलगा वारला तेव्हा त्यांच्या मोठ्या बहिणीबरोबर शेतातील कामावर हजर झाल्या. भूक व गरिबी ह्या दोन गोष्टींमुळे येथील स्त्रियांची या नाजूक दिवसात अतिशय आबाळ झालेली दिसते.

**रूढीपरंपरा – सणवार :**

दलित समाजातील रूढीपरंपरा आणि अंधश्रद्धा यांचा तपशील दलित स्त्रियांच्या आत्मकथनांत सापडली. वर्णव्यवस्थेच्या जाचक रूढींखाली दबला गेल्यामुळे अज्ञानी दलित समाज अंधश्रद्धेखाली जखडला गेला होता. खायला अन्न नाही. हातात रोख पैसा नाही अशा अवस्थेत. गावातील मांत्रिक, पेतराज यांच्या अमलाखाली हा समाज गाडला गेला होता. एखादा माणूस आजारी पडला तर वैद्यकीय उपचारापेक्षा गंडा दोरा, कोंबड बकरं देवाला दाखवल जाई. लेखिकेच्या बहिणीचा नवरा मरतो. तर त्याच्यावर करणी केली असे सर्वांना वाटते. लेखिकेची आईही डॉक्टरी उपचार नाकारते. जावयाचे म्हणजे लेखिकेच्या बहिणीच्या नवऱ्याने करणी केली असेल या संशयाने उपचाराअभावी मृत्यू पावते. 'सदा' या व्यक्तीचे उदाहरण असेच आहे. आठ दिवसात तुझे मरण आहे म्हणून एका कुडमुड्या जोश्याने सांगितल्यामुळे तो व घरातील सारी मंडळी आठ दिवस रडत बसतात व तो दिवस

सरल्यावर सारी आनंदाने हसू लागतात. यातील विनोदाचा भाग सोडला भाम्रक समजुतीमुळे व अज्ञानामुळे, अक्षर ओळख नाही त्यामुळे देवधर्म, रूढीपरंपरांचे पालन हेच महारांचे जीवन होते.

अशा या दैन्य उपासमार दुःखाच्या, कौटुंबिक कलहातून सुटका म्हणजे काहीतरी वेगळे मनोरंजन दलितांच्या आयुष्यात फार थोडे असे. 'रायरंद' ह्या जमातीचे वर्णन शांताबाईंनी केले आहे. ही जमात फक्त दलितांचे मनोरंजन करत असे. तसेच पौष महिन्यात यल्लमा देवीची यात्रा भरत असे. त्याचे वर्णनही त्यांनी केले आहे. त्यातील 'कीच' हा प्रकार असे. ज्या लोकांनी देवीला नवस केला आहे ती लोक खाली झोपत व जोगते-जोगतीणी त्यांच्या अंगावर चालत जात. पुजारीही पेटत्या विस्तवातून चालत जात असे. शिकलेल्या असूनही शांताताई या यात्रेला गेल्या होत्या. शांताबाईंच्या बहिणीचा नवरा काही कामधंदा करत नव्हता म्हणून बहिणीला माहेरी ठेवल होत. पुढं तो देवरूषीपण शिकून आला. त्याचे उदाहरण बोलके आहे. ''दहिवडी गावच पोरगा आजारी हुता, त्याच्या खान भावजींकडे आनल. पोराला बगितल्याबरूबर सांगितले, ''याला झपाटलया, त्याच्या अंगावरून खैरी कोंबडी, सात घानाचा दांमटा, सात कोळलाचं तेलरांद, एक लिंबू, एक आंड, शुकीरवारी तीन वेळा पोराच्या अंगावरून ओवाळॅन टाका.'' सगळीकडे त्याचं नाव पसारल.''[१७] (पृष्ठ क्र.४३, ४४) अशाप्रकारे त्यांच्यात समाजातील एक व्यक्ती भोळेपणाचा फायदा घेऊन उत्पन्नाचे साधन म्हणून ही शिक्षा शिकला.

अज्ञान व अंधश्रद्धेपायी ही जनता जनावरांपेक्षा वाईट आयुष्य जगत होती. अज्ञानापोटी नकळतपणे रूढींचे पालन करत होती. शांताबाईंची बहीण बाळंतपणासाठी माहेरी आली होती. नेमका पाचव्या दिवशी एक बैल गावात मेला.

मेलेल्या जनावरांचे मांस खाण हा महार संस्कृतीचा एक भाग होता. पण त्याच्याही मुळाशी रूढींचे पालन होते. मेलेल्या बैलाच्या मासातील अवयवाचे पाच प्रकार ओल्या बाळातिणीला देण्याची पद्धत होती. पाच पालव्या म्हणजे 'रव्याचा हुकडा' काळजाचा तुकडा डराडी, पासी, कनवर मिळून पाच पालव्या होतात. त्याचे वर्णन शांताबाईनी केले आहे, ''आय मला म्हनली, नाजा पासी दिली का ग बाळंतनीनं पासी खाल्ल्यावर लय दूध येत.'' (पृष्ठ क्र.४४) अशाप्रकारे अंधश्रद्धेमुळे निकृष्ट व किळसवाणे जीवन दलित समाज जगत होता. केवळ रूढींचे पालन हा पगडा विलक्षण मनावर असल्यामुळे विशेषत: स्त्रियांकडून भोळसटपणामुळे ह्याचे पालन होत असे.

## नातीगोती :

'माज्या जल्माची चित्तरकथा'मध्ये नाती एकमेकांनी गरीबीतही जपलेली दिसतात. शांताबाई व त्यांच्या वडलांचे संबंध, शांताबाई-आईचे संबंध, शांताबाईनी आपल्या भावंडानाही मदत केली. तसेच कांबळेमास्तराच्या दुसऱ्या बायकोच्या मुलांचाही सांभाळ केला. नणंदेचा संसार सांभाळला. मुळातच शांताबाई सोशिक व सहनशील होत्या. म्हणूनच नवऱ्याचे सारे जुलूम सहन करून परत त्यांच्याबरोबर संसार करून त्यांनी मुलांनाही शिकवले. त्यांचे वडील आप्पाबद्दल त्यांना अतिशय जिव्हाळा होता. वडिलांच्या मृत्यूच्या प्रसंगाची आठवण सांतगाना लेखिका लिहिते शेवटी, 'मी आले तेंव्हाच आप्पा माझ्याशी बोलले ते पुन्हा कधीच बोलले नाहीत.... आप्पा वारले. मला भयंकर दु:ख झाले, आप्पा होते त्यामुळे आईचे दु:ख इतके जाणवले नाही. आता मायेचे जवळचे कोणी नाही असे वाटले.'[१८] (पृष्ठ क्र.११२) शांताबाईंचे हे प्रेम सहाजिकच आहे. कारण

पन्नास वर्षापूर्वी इतर मुली शेतात काम करत होत्या तेव्हा शांताबाईंच्या वडिलांनी एक मजूर असूनही आपल्या मुलीला शिकवले. शांताबाई कांबळे यांचे दलित स्त्री म्हणून असणारे जीवन त्यांच्या समकालीन दलित स्त्रीसारखेच होते. पण त्यांनी शतकानुशतकांच्या रूढींचे उल्लंघन केले. दारिद्य झुगारून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या साफल्यामागे त्यांची जिद्द होती. कष्ट होते. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या समाजाला डॉ. बाबासाहेबांच्या नवविचारांची प्रेरणा होती. त्या प्ररेणेचे बळही त्यांना लाभले. त्यांच्या आईने मृत्युसमयी त्यांच्या वडलांकडून वचन घेतले होते. ''पोरींची शाळा पुरी करा, तिला मास्तर नवरा करा.''[१९] (पृष्ठ क्र.४७) लेखिकेच्या वडिलांनी हे वचन पाळले. इतक्या ! प्रतिकूल परिस्थितीतून वर आल्यावर जीवनाचा एक अध्याय संपून दुसरा अध्याय सुरू झाल्याचे वर्णन त्या करतात, ''मन शांत झाले, इतके कष्ट झाल्याचे सार्थक झाले. माझा एक प्रवास संपला व दुसरा चालू झाला.''[२०] (पृष्ठ क्र.१६५) याचे कारण त्यांच्या हातात नातू झाल्याची तार असते. अशाप्रकारे मुलगी, पत्नी, शिक्षिका व शेवटी एक यशस्वी आजी होण्याची त्यांची इच्छा म्हणजे या आत्मकहाणीचा व त्यांच्या सफल जीवनकहाणीचा शेवट आहे.

## दलित स्त्रियांचे जीवन व शिक्षण :

आत्मचरित्रांतून अथवा आत्मकथनांतून समाजजीवनाचे दर्शन घडते तसे काळाचेही दर्शन घडते. शांताबाईंनी सांगितलेल्या अनुभवातून बदलता काळही जाणवतो. जो कालपट त्यांच्या आत्मकथनांतून निर्देशित होतो त्या काळात परिवर्तनाची प्रक्रिया निश्चितच सुरू झाली होती. स्पृश्यास्पृश्य भेद संपुष्टात आला नव्हता पण शिक्षणाच्या माध्यमातून सांस्कृतिक अभिसरण सुरू झाले होते.

आत्मोकर्षासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे सत्य लेखिकेला जाणवले. म्हणूनच आत्मकथनाची सुरूवातच लेखिकेने तिचे नाव शाळेत घालण्याच्या प्रसंगापासून केली आहे. १९३०-४५ च्या सुमारास ग्रामीण भागात शिक्षणविषयक परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती. म.फुले यांच्या प्रेरणेने काही समाजहितचिंतकांनी प्रयत्न करूनही बहुजन व दलित समाजात शिक्षणाच्या उदासीनता होती. दलित समाज तर शिक्षणाच्या संदर्भात वंचितच राहिलेला होता. दलित समाजाच्या जगण्याचेच प्रश्न इतके भीषण होते, भुकेचा प्रश्न इतका भयंकर होता, दैन्यदारिद्रय इतके कमालीचे होते की, कामधंदा सोडून शिक्षणाकडे लक्ष देणे शक्य नव्हते. मुलींच्या बाबतीत तर शिक्षणाचा विचार करणेच दुरापास्त होते. उपासमार, काबाडकष्ट, याची सवय मुलींना लहान वयातच व्हायची व जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आई, मुलगी, सून, सासू या नात्यातील प्रत्येक पातळीवर येथील स्त्रीने संघर्ष कलेला आहे. उपासमार सहन केलेली आहे. शाळेला जागा मिळणेही कठीण होते. सवर्ण शिक्षक अस्पृश्यांच्या मुलामुलींना शिकवत नव्हते. अस्पृश्य मुलांना सगळ्यांपासून दूर ठेवले जाई. अशा स्थितीत दलित वस्तीत शाळा काढून दलित शिक्षक मुलांना शिकवत हे सामाजिक परिवर्तन होते. तरीही दलित समाजात शिक्षणाविषयी अजून आस्था निर्माण झाली नव्हती. अशा परिस्थितीत 'नाजाच्या' आईवडिलांनी मुलीला सातवीपर्यंत शिकवले. शेतकीशाळेत नाजा एकटीच होती. पंढरपूरला मुलींच्या शाळेत घालण्याइतकी ऐपत नव्हती. म्हणून नाजाला वर्षभर घरी बसावे लागले होते. पण पुन: शाळत जाऊन 'नाजाने' खडतर परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले. आणि परिस्थितीमुळे समाजाच्या वाट्याला आलेला दु:खभोग यातना, अन्याय, अत्याचार, यांचा तोच तो पाठा वाटण्यापेक्षा त्यातून मुक्त होण्याचा प्रयत्न

करेण आणि तो सिद्धीस नेणे त्या काळाच्या संदर्भात असाधारण होते. म्हणून शांताबाईंचा संघर्ष लक्षणीय वाटतो. शिक्षणाची आस्था त्यांच्या आईलाही होती. म्हणूनच ती वडलांना सांगायची, 'आपण खायाचं वायच कमी करून तिला पुस्तक पोलकं घेऊया.'[२१] (पृष्ठ क्र.१४) नाजाला शाळेत बक्षीसं मिळाली को आईवडिलांचे मन अभिमानाने भरून येते. सुटीच्या दिवशी शेंगा वेचायला इतर मुलींबरोबर शेंगाला गेली तर आईने खूप मारलं. पुढे शिकून नोकरी लागल्यावर माहेरी गेल्यावर त्यांच्या मैत्रिणी त्यांना म्हणतात, ''तू शिकलीस म्हणून मुलं शिकली. आता आरामात आहेस नाहीतर आमचे बघ ! दुसऱ्याच्या रोजगारीने जाते. कवा काम लागते कवा लागत नाही. आमी शिकलू असतो तर तुझ्यासारखे झाले असते.''[२२] (पृष्ठ क्र.१५६) शांताबाईंचे तीनही भाऊ शिकले नाहीत. गवंडी कान करू लागले. हे शांताबाईंनी पाहिले होते म्हणून त्यांनी वाटेल त्या परिस्थितीत आपल्या मुलांना शिकवलं तो निर्धार अखेरपर्यंत त्यांनी पाळला यातच त्यांची जीवनकर्तृत्त्वाची इतिकर्तव्यता होती. कांबळे मास्तरांचे दुसरे लग्न झाले तेव्हा न डगमगता परखडपणे सांगितले. ''बायकू केलीया ! आता मी काय येत नाय ! तिला घेऊन जावा आणि खुशाल राज्य करा. आता माझी आशा सोडाच !''[२३] (पृष्ठ क्र.८०) दलित स्त्रीने इतक्या खंबीरपणाने भूमिका घेणे, त्याकाळी अपवादात्मक होते. शिक्षणामुळे आलेले हे बळ व आंबेडकरांची विचारसरणी या दोहोंवर एक सामान्य स्त्री कर्तृत्त्वाची शिडी स्वबळावर चढली.

इतर स्त्रियांचे जीवन मात्र हलाखीचे होते. त्यांची आई, बहीण, शेजारणी, मैत्रिणी या इतर दलित जीवनाप्रमाणे समाज व कुटुंब या दोन्ही पातळीवर भरडत जगत होत्या. पुरूषप्रधान संस्कृती, अंधश्रद्धा यामुळे दलित स्त्रियांचा मानसिक

विकास होणे कठीण होते. आजारी पडल्यावर वैद्यकीय उपचार होणे हा बदल किंवा, स्त्रिशिक्षण, हे उन्नतीकारक बदल बाबासाहेबांच्या चळवळीमुळेच दलित स्त्रियांच्या आयुष्यात झाले. म्हणूनच मुल होण्यासाठी नवस करणाऱ्या शांताबाई नंतर गंगूच्या (बहिणीच्या) मुलांवर मात्र वैद्यकीय उपचार करतात. हे झालेले बदल एकट्या शांताबाईंच्या आयुष्यात झाले नसून शिक्षणामुळे वंचित राहिलेल्या असंख्य दलीत बांधवात झाले. हे सांस्कृतिक संदर्भ शांताबाईंच्या आत्मकथनांत आठवणींच्या ओघात येतात. शिक्षणामुळे मानसिक स्तर उंचावला जातो. याचे प्रत्यंतर शांताबाईंचे आत्मकथन वाचताना येतो. विलक्षण संयमीपणे त्यांनी आपले व आपल्या समाजाचे दु:ख आपल्या आठवणींचया ओघाने चितारले आहे.

## ३.५ 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' सांस्कृतिक विशेष:

आत्मचरित्रात व्यक्तिजीवनाचे चित्रण असते व व्यक्तिजीवन हे संदर्भसापेक्ष असते. म्हणूनच प्रत्येक आत्मकथनांत सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक संदर्भ येतात. दलित आत्मकथनाचा विचार केला तर एकट्या व्यक्तीपेक्षा समाजाच्या दु:खद प्रसंगचित्रणावर अधिक भर दिला जातो. त्यामुळे समाजाची सुखदु:खे अशाआकांक्षा, ताणतणाव यांचे विराट रूपच त्यातून व्यक्त होते. भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी खदखदणाऱ्या जातिभेद, अंधश्रद्धा, अज्ञान, रूढीग्रस्तता, श्रेष्ठ कनिष्ठता ह्या प्रश्नांनी बधीर झालेल्याएका प्रचंड समूहाचे प्रत्ययकारी चित्रण आपल्याला बघायला मिळते.

अखिल मानव जातीच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान सांगणारे म्हणून दिलत साहित्याला ओळखले जाते. सर्वच दलित आत्मकथनांत येणारे स्त्री-पुरूष प्रादेशिक वैशिष्ट्यांना युक्त आहेत. या स्त्रिया महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रांतातील

असल्यामुळे त्या-त्या प्रांतातील भाषिक संस्काराचा प्रभाव त्यांच्या लेखनातून जाणवतो. स्वाभाविकता ही येथील बोलींची वैशिष्ठ्यपूर्णता आहे. बोलींच्या वापरामुळे दुर्लक्षित अनेक शब्दधन, प्रकाशात आले. शांताबाई कांबळे व बेबीताई कांबळे या दोघींच्या आत्मकथनांत भाषा बोलीकडून प्रमाणभाषेकडे संक्रमित होताना दिसते. नागर आणि बोली भाषेचे मिश्रण असलेले संवाद आणि या संवादातून प्रकटणारी सांस्कृतिक मूल्ये लक्ष वेधून घेतात.

दलित समाजातील रूढी-परंपरा आणि अंधश्रद्धा यांचा तपशील दलित स्त्रियांच्या आत्मकथनांत आढळतो. विवेकाला फाटा देणारी आणि परंपरांना कवटाळणारी वृत्ती त्यातून दिसते. 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मचरित्रात, अंगात आलेली स्त्री रूग्णाला बरे करण्यासाठी अंडी-भात यासारखे पौष्टीक अन्न मागते आणि अंगारा धुपारा करायला सांगते. 'एका आठवड्यात मरशील' असे भविष्य वर्तवणारा कुडमुड्या जोशी आणि या भविष्यवाणीमुळे हवालदिल झालेला खेडूत इथे भेटतो. कावळ्याचा स्पर्श झाल्यामुळे अपशकून झाला असे समजून गंगू आपल्या निधनाचा निरोप माहेरी पाठवते आणि दाणादाण उडवून देते. शांताबाईचा पती कोणत्याही पूर्वसूचना न देता विवाहबद्ध होतो आणि शांताबाईंना मानसिक यातनेच्या दरीत बिनदिक्कत सोडून देतो. चमत्कारिक परंतु सत्य अशा या घटना अंधश्रद्धा, स्त्री-परंपरेच्या द्योतक आहेत. 'बेबी कांबळे' अत्यंत लहान असताना आजारपणामुळे आणि अशक्तपणामुळे आईच्या मांडीवर प्रेतवत निश्चल पडून होत्या. मुलगी गेली असे समजून सगळ्यांनी एकच गिल्ला केला. रात्रीत दफन करण्याला आईने विरोध केल्यामुळे रात्रभर बेबीताई आईच्या मांडीवर होत्या. ऊब मिळाल्यावर त्या हालचाल करू लागल्या तर पूनर्जन्म झाला असे समजून मग

नवसविधी वगैरे पार पाडले गेले. हा अडाणीपणा अंधश्रद्धेमुळे होता. मूठ मारण्याचा आव आणून फसविणारे मांत्रिक, रोग्याला बरे करण्यासाठी अघोरे उपचार करणारे देवरषी, आदि अंधश्रद्धा जोपासणारे भोळेभाबडे लोक येथे भेटतात.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनाचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे व सांस्कृतिक संदर्भाच्या दृष्टीने महत्त्वाचेही आहे. येथील अंधश्रद्धा, रूढी परंपरा, दारिद्रय, भूक, वेदनादायक जीवनदर्शन, महाराष्ट्रातील विविध प्रांतातील बोलीभाषा, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोन आंबेडकरी चळवळीचा संदर्भ आदी घटक या आत्मकथनांत अंतर्भूत आहेत. 'रायरंद' ही जमात फक्त दलित समाजाचे मनोरंजन करणारी असते. ही माहिती फक्त 'माज्या जल्माची चित्तरकथेत' मिळते. धान्याच्या रूपाने मिळणारे बलुते महारांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन होते. हेही वाचायला मिळते. गावकुसाबाहेरील वस्तीत तराळकीची प्रथा दिसते. महारवाड्यातील प्रत्येकाच्या वाट्याला ही तराळकी येत असे. गावगाड्यातील प्रत्येकाच्या वाट्याला ही येत असे. गावगाड्यातील कमी दर्जाची अस्वच्छ स्वरूपाची कामे करणारा दलित तराळ म्हणून ओळखला जातो.

रूढींचे पालन हा दलितांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. वर्णव्यवस्थेच्या वरंवट्याखाली दबल्या गेल्यामुळे अज्ञानी दलित समाज अंधश्रद्धेखाली जखडला गेला होता. या अंधश्रद्धेपोटी तो अनेक परंपरांचे पालन, अनुकरणत होता. परंपरापालनात बुद्धिपेक्षा भावना वरचढ असते व या भावनेच्या आधिन झालेला माणूस देवधर्मांच्या भ्रामक समजुतीपायी कर्मकांडाच्या आहारी जातो. याचे चित्रण दोन्ही आत्मकथनांत याची उदाहरणे आढळतात. पन्नास वर्षापूर्वीची महार संस्कृती व महार लोकजीवन दोन्ही आत्मकथनांमुळे आपल्यासमोर

उभे रहाते. महार स्त्रीच्या जीवनातील अनेक आवर्तने या आत्मकथनांमुळे आपल्यासमोर उभी राहतात. स्त्रीचे बालपण, यौवन, प्रौढपण, वृधत्त्व सर्वच पातळीवर शोषण होताना दिसते. कुटुंब व समाज या दोन्ही पातळीवर येथील स्त्री संघर्षरत दिसते. आतापर्यंत दलित आत्मकथनांत पुरूषांनी केलेला संघर्ष आपल्याला पहायला मिळाला 'पण एक स्त्री' म्हणून व 'दलित म्हणून' अशा दोन्ही पातळीवर अन्याय सहन करणारी स्त्री या आत्मकथनांमुळे आपल्यासमोर आले.

स्त्री-पुरूष, लहान मुले, सारे कुटुंबच अन्यायग्रस्त होते. अशावेळी ज्या क्रांतिकारी महामानवाचे आगमन झाले व एकदम अंधारी रात्र जावून दिवस व्हावा तसे दलितांच्या समाजात झाले. वर्षानुवर्षाची गुलामगिरी दास्य झुगारून महार समाज जागृत झाला, त्याला 'वाणी' व 'लेखणी' दोन्हींची ओळख झाली. धर्मांतरासारख्या सांस्कृतिक घटनेचे पडसाद समग्र महार समाजावर झाले व आतापर्यंत विशिष्ट सामाजिकतेमुळे ज्ञानापासून वंचित राहिलेली ही जनता आपल्या अस्मितेचा शोध घेता घेता आपल्या सांस्कृतिकतेलाही भेद देऊ लागली. त्याचे उदाहरण दोन्ही आत्मकथनांत आढळते. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांची विचारसरणी तळागाळापर्यंत पोहचल्याचे उदाहरण म्हणजे स्त्रियांची आत्मकथने होय. शिक्षणाचे महत्त्व दोन्ही लेखिकांच्या आईवडिलांना आल्यामुळे दोघीनाही आत्मोकर्ष करून घेणे सोपे गेले. पण त्यासाठी लागणाऱ्या यातना दोघींनीही सोसल्या. विशेषत: अस्पृश्यतेचे अनेक चटके दोघींनाही बसले.

दलित आत्मकथनांनी एका व्यक्तीच्या जीवनतील भूतकाळ आणि वर्तमान काळाचे अंतर्बाह्य मांडले असले तरी ते 'स्वयं' केकंद्रीत चरित्र नव्हे. कारण त्यात त्या व्यक्तीचा समाज व त्या समाजाची संस्कृती अंतर्भूत असते. म्हणून दलित

आत्मकथने ही विविध जाती-जमातीच्या जीवनाशी, आर्थिकतेशी, सामाजिकतेशी, राजकारणाशी, सांस्कृतिकतेशी संबंधित असतात. या आविष्करणातून व्यापक सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा आलेख चित्रित होतो.

**सारांश :**

कोणत्याही व्यक्तीचे जीवन हे संदर्भसापेक्ष असते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असे अनेक संदर्भ जीवनाला वळण लावत असतात. दलित स्वकथनांचा विचार केला असता या संदर्भांनीच व्यक्तीचा विकास खुंटविला गेल्यामुळे सर्वच आत्मकथनांत याविषयी विद्रोही सूर आढळतो. या विद्रोही सुराबरोबर परिवर्तनाची इच्छाही दिसते. एकंदर अंधश्रद्धा, दारिद्र्य आणि अस्पृश्यता यांनी बळी गेलेल्या शोषित समाजाचे दर्शन घडविणे, बिकट वास्तव बदलणे व जीवनार्थाची नवीन संगती लावून त्याची प्रतीती देणे या भूमिकेतून लेखन झाल्यामुळे दलित आत्मकथनांत सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ दिसून येतात. दलित स्त्रीने एक स्त्री म्हणून दिलेले कष्टमय जिण्याचे बलीदान हे इतर सवर्ण स्त्रीच्या वाट्याला क्वचितच आले असेल. म्हणून सामाजिक व सांस्कृतिक दोन्ही पातळीवरील ही आत्मकथने खरी उतरली आहेत. रूढी-परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, समज-गैरसमज, दु:ख, दैन्य यांची समग्र माहिती तर मिळतेच पण पन्नास वर्षापूर्वीची महार संस्कृती तिच्या बारीसारीक तपशिलासह आपल्यासमोर उभी रहाते. त्याचे श्रेय या दोन्ही आत्मकथनांना आहे.

या दोन्ही आत्मकथनांची सामाजिक व सांस्कृतिक चिकित्सा केल्यावर आता पुढील प्रकरणात दोन्ही आत्मकथनांची वाङ्मयीन गुणवत्ता लक्षात घेऊ.

-----

# संदर्भ ग्रंथ सूची


१) कर्वे, इरावती : 'मराठीतील स्त्री आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', प्रकरण पहिले - स्त्री आत्मचरित्रांची सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी - वडगबाळकर श्रुती- श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००६.

२) लुलेकर, प्रल्हाद : 'आक्रोश वेदनांचा' (संपा. रेडकर आरती, दास राजेंद), प्रकाशक शिवाजी महाविद्यालय,बार्शी, 'दलित आत्मकथन व्यावहारिक सांस्कृतिक चिकित्सा', पृष्ठ क्र.६६.

३) कांबळे, बेबी : 'जिणं आमुचं' - रचना प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र.९३.

४) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.५७.

५) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.६०.

६) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.१७.

७) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.९६.

८) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.९७.

९) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.५१.

१०) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.५२-५३.

११) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.६६.

१२) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.६७-६८.

१३) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.६८.

१४) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.७०.

१५) कांबळे, बेबी : तत्रैव, पृष्ठ क्र.७०.

१६) कांबळे, शांताबाई : 'माज्या जल्माची चित्तरकथा', सुगावा प्रकाशन, पृष्ठ क्र.७२.

१७) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.४३-४४.

१८) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.११२.

१९) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.४७.

२०) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.१६५.

२१) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.१४.

२२) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.१५९.

२३) कांबळे, शांताबाई : तत्रैव, पृष्ठ क्र.८०.

-----